I J R S S I S,Spl Issue (IV), March-2022 :185-187 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
OPEN ACCES
Reg. No. : MH-NGPA/00011
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोविड– १९–आर्थिक आणि सामाजिक परिणाम

श्री. राहुल संबाजी पथाडे
डॉ. खत्री महाविद्यालय, चंद्रपूर

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 30.03.2022

**सारांश :**
२०२० साली देशात कोरोनाचा उद्रेक झाला. त्यामुळे संपूर्ण जनजिवन विस्कळीत झाले राज्यात लागू झालेल्या नियमांनुसार अत्यावश्यक सेवा व कामाशिवाय सर्वांनी घरी बसणे सक्तीचे झाले. या रोगाच्या संसर्गाची सुरुवात डिसेंबर २०१९ मध्ये चीन च्या वूहान शहरात झाली. जागतिक आरोग्य संघटना (WHO) ने या आजाराला जागतिक महामारी म्हणुन घोषीत केले. अश्या या कोरोना मुळे सामान्य जनतेला कोणकोणत्या संकटांना तोंड दयावे लागले. कोरोनाचा आर्थिक, सामाजिक जीवनावर काय परिणाम झाला. विदयार्थ्यांवर काय परिणाम झाला. तसेच या आजाराची लक्षणे व उपाय यावर प्रस्तूत लेखात सविस्तर माहिती दिलेली आहे

**महत्वाचे शब्द :–**कोरोना, विषाणू (Virus), कडकनिर्बंध (Lockdown), रोगप्रतिकार शक्ती (Immunity)

**प्रस्तावना :–**

कोरोना विषाणू (वायरस) ला सामान्यपणे कोविड–१९ म्हणून ओळखतो. हे एक संक्रमण रोग म्हणजेच एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे जाणारी आहे. हा रोग आपल्या श्वसन तंत्राला प्रभावित करतो. हा एक नवीन वायरस आहे. जो संपूर्ण जगाला फार वाईट प्रकारे प्रभावित करित आहे. कारण याचा फैलाव एकमेकांच्या संपर्कामुळे होत आहे.

**याचा प्रसार कसा झाला :–**

सर्वात पहिले कोविड–१९ ची ओळख चायनाच्या वुहान सिटिमध्ये डिसेंबर २०१९ मध्ये झाली. मार्च २०२० मध्यें WHO नी घोषित (डिक्लियर) केल की कोविड–१९ हा एक संक्रमक रोग आहे.

कोविड–१९ कोरोना विषाणू (व्हायरस) ने दैनंदिन जीवनावर परिणाम केला आहे आणि जागतिक अर्थ–व्यवस्था मंदावत आहे. या साथिच्या रोगाने हजारो लोकांना प्रभावीत केले आहे. जे एकतर आजारी आहेत किंवा या रोगांच्या प्रसारामुळे मारले जातआहेत.

कोविड–१९ ने आपल्या दैनंदिन जीवनावर, व्यवसायावर झपाटयाने परिणाम केला आहे. जागतिक व्यापार आणि हालचाली ही विस्कळीत झाल्या आहेत. विषाणूचा प्रसार नियंत्रीत करण्यासाठी रोगाची सुरूवातीच्या टप्प्यावर ओळख करणे अत्यावश्यक आहे कारण तो एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे वेगाने पसरतो. बहुतेक देशांच्या उत्पादनांची निर्मिती मंदावली आहे. या रोगामुळे विविध उद्योग आणि क्षेत्रे प्रभावित होतात; यामध्ये औषधोत्पादन (फॉर्मासिटीकल) उद्योग, सौर उर्जा क्षेत्र, पर्यटन, माहिती आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योग यांचा समावेश आहे.

हा विषाणू नागरिकांच्या दैनंदिनी जीवनावर तसेच जागतिक अर्थव्यवस्थेवर लक्षणीय परिणाम घडवून आणतो आहे. इतर राष्ट्रांप्रमाणे भारत देशातील अर्थव्यवस्था विस्कळीत झाली आहे. भारत देशात अनेक लोक मजुरीचे काम करित असतात. अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. १४ एप्रिल रोजी सायंकाळपासुन राज्यभरात संचारबंदी काण्यात आली. जीवनावश्यक वगळता सर्व दुकाने बंद करण्यात आली त्यामुळे या निर्णयाचा आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना फटका बसु लागला. सततच्या

लॉकडाऊनमुळे सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेष परराज्यातील मजुरांचे मोठे हाल झाले आहेत.

कोरोना संसर्ग रोखण्यासाठी वेळोवेळी लावलेल्या कडक निर्बंध (लॉकडाऊन) मुळे दारिद्रय रेषेखालील लोकांना आर्थिक संकटांचा सामणा करावा लागला.

**लक्षणे :–**

या विषाणुजण्य संसर्गांची सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे ताप, सर्दी, खोकला, हाडे दुखणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे आणि शेवटी न्युमेनिया होणे हे आहे.

सध्या दैनंदिन जीवनात कोविड–१९ चे परिणाम व्यापक आहेत आणि त्याचे आर्थिक आणि सामाजिक दुरगामी परिणाम आहेत.

**आर्थिक परिणाम :–**

१) जिवनावश्यक वस्तुंच्या उत्पादनाची गती मंदावणे.

२) उत्पादनाच्या पूरवठा साखळीत व्यत्यय आणणे.

३) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायातील तोटा.

४) बाजारात रोखीचा प्रवाह मंदावलेला आहे.

४) महसुलीच्या वाढीमध्ये लक्षणीय घट.

सामाजिक परिणाम :–

१) सेवा क्षेत्र त्यांच्या याग्य सेवा प्रदान करण्यास सक्षम नाही.

२) मोठया प्रमाणात खेळ आणि स्पर्धा रद्द करणे किंवा पुढे ढकलने.

३) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रवास टाळणे आणि सेवा रद्द करणे.

४) सांस्कृतिक, धार्मिक आणि उत्सवाच्या कार्यक्रम मध्ये व्यत्यय.

५) लोकांमध्ये अंवाजवी ताण.

६) हॉटेल, रेस्टॉरंट, आणि धार्मिकस्थळे बंद करून मनोरंजनासाठी ठिकाणी बंद करणे जसे की चित्रपट आणि नाटके, स्पोट्सक्लब, व्यायामशाळा , स्विमिंगपुल इ.

७) विद्यार्थ्याची परिक्षा पुढे ढकलणे.

**प्रभाव–**

कडक निर्बंध (लॉकडाऊन) हा एकच प्रभावी उपाय या कोविड– १९ विषाणुची साखळी तोडून काढण्यास सरकारने अमलात आणले आहे. लॉकडाऊनच्या वारंवारितामुळे संपूर्ण प्रभाव मजुरावर पडत आहे. त्यांना वेळेवर जेवण न मिळाल्यामुळे, औषधोपचार न मिळाल्यामुळे मृत्युला बळी पडावे लागत आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सर्व संस्था बंद करण्यात आली त्यामुळे भरपुर नुकसान झालेले आहे. विशेष म्हणजे शैक्षणिक संस्था व महाविद्यालय बंद केल्यामुळे पुष्कळ लोकांना आपला रोजगार गमवावा लागलेला आहे.

**उपाय :–**

या रोगावर कोणतेही वैक्सीन, मेडीसीन, ड्रग्स तयार झालेले नाही. म्हणुन यावर एकच उपाय (रोकथाम) आहे.

१) मास्क लावणे, २) हात धुणे ३) ५ – ६ फीटची दुरी ठेवणे

४) डोळे, नाक, तोड यांना वारंवार हात न लावणे ५) ज्या वस्तुमुळे रोगप्रतिकार शक्ती (इम्युनिटी) वाढेल त्या सर्व वस्तु आणि पदार्थ खाणे.

तसेच वेगवेगळया वॅक्सीन निघाल्या असल्यामुळे व उपाय योजना केल्यामुळे रोकथाम करण्यास मोठया प्रमाणावर मदत होवू शकते.

**निष्कर्ष :–**

कोरोना विषाणू (वायरस) (कोविड–१९) संपूर्ण गंभीर समस्यांपैकी एक समस्या आहे. संपूर्ण जगातील लोक याचा सामना करित आहेत. आता आवश्यक हे आहे

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

की, जेवढया लवकर संभव होत असेल तेवढया लवकर या स्थितीमधुन बाहेर येणे. अर्थात सर्वानि मिळून आपण या कोविड–१९ वायरसला पळवून लावु शकतो. आणि हळूहळू आपण यशाच्या वाटेवरती येवू शकतो आणि प्रगती करु शकतो.

आजच्या घडीला पाहिल तर आता हे जीवन सुरळीत चालू झालेले आहे हे दिसून येते. लोक आपआपल्या मार्गांनी सुरळीतपणे लागतांना दिसून येत आहे. आता खुप प्रमाणात परिस्थिती बदललेली असून, व्हॅक्सीन मुळे किंवा वेगवेगळया उपाय–योजना वापरुन लोकांनी परिस्थीतीशी समजून घेवुन या विषाणू पासून बचाव मोठया प्रमाणात केला आहे.

## संदर्भ:–

लोकमत न्युज नेटवर्क– १७ एप्रिल २०१९

http://www.nebi.nlm.nih.gov.pmc/articles/pmc 7147210